**विशेष दिवाणी दावा क्र. १२२/२०२३ मधील नि.३३ वरील आदेश**.

१. अर्ज व म्हणणे पाहिले. उभय पक्षांचे सुविदय वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

२. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी त्यांच्या अर्जात कथन केले आहे की, मुदतीत प्रतिवादींनी कैफियत दाखल करणे आवश्यक होते. परंतु आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध झाली नाहीत. तसेच प्रतिवादी क्र.१ क्षयरोगनाने आजारी आहेत. प्रतिवादी क्र. ३ दरम्यानच्या काळात गरोदर होती. तसेच प्रतिवादी क्र. २ व ४ या महिला असल्याने सदरील दाव्याची कैफियत दाखल करता आली नाही. दरम्यान प्रतिवादींविरुध्द विनाकैफियत आदेश झाला आहे. प्रतिवादी यांनी जाणिवपुर्वक विलंब केलेला नाही. कैफीयत अभिलेखावर न आल्यास प्रतिवादींचे अपरिमित नुकसान होणार आहे. तरी कैफीयत देण्यास परवानगी मिळावी असे त्यांचे कथन आहे.

३. वादीने त्याच अर्जावर म्हणणे देवून अर्जास हरकत दर्शविली. त्यांच्या कथनानुसार, अर्ज खरा, बरोबर व कायदेशीर नाही. झालेल्या उशिराबाबत विश्वासार्ह कारण दिले नाही. अर्ज ढोबळमानाने दाखल केला आहे. सबब अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा अशी विनंती त्यांनी केली आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन करता, दि. ०९/०८/२०२३ रोजी प्रतिवादींना समन्सची बजावणी झाली. त्यानंतर ते वकीलांमार्फत प्रकरणात हजर झाले. समन्स बजावणीपासून कमीत कमी ३० व जास्तीत जास्त ९० दिवसांत कैफियत देणे आवश्यक असताना त्यांनी विहित मुदतीत कैफीयत दिलेली नाही. प्रस्तुत दावा प्रतिवादींविरुध्द

कराराच्या पुर्ततेकरीता व निरंतर ताकीद मनाई हुकुमासाठी दाखल केला आहे. त्यामुळे प्रतिवादी यांना कैफीयत देण्यास संधी न दिल्यास मुळ वादमुद्दा गुणदोषावर निर्णित न होता नवीन प्रकरण दाखल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याउलट कैफीयत अभिलेखावर आल्यास उभय पक्षकारांचा पुरावा होवून वादातील मुदयांचे एकाचवेळी गुणदोषावर निरसन होईल. त्यामुळे कैफियत देण्यास झालेला विलंब माफ करणे न्यायाचे दृष्टीने संयुक्तिक ठरणार आहे. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आ दे श**

अर्ज (नि.३३) मंजूर करण्यात येत आहे.

SHIVAJI PANDHRINATH KEKAN

Digitally signed by SHIVAJI PANDHRINATH KEKAN
Date: 2025.01.24 15:06:25 +0530

श्रीगोंदा. | दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
दिनांक २४/०१/२०२५. | श्रीगोंदा, जि. अहमदनगर.